
# प्रिंटिंग एरिया

Issue-75, Vol-01, April 2021
onal Peer Reviewed Multilingual Research Journal




Editor
apu G.Gholap

www.vidyawarta.com

14) Understanding Human Security: Through the Narratives of Global Human ...
RAJU DAN ||82

15) History of Agriculture in India : A Critical Analysis
Rekha Kumari, Bodh-Gaya ||89

16) Socio-Economic Conditions of Manual Scavengers
Ms. Sharmishtha Solanki, Anand, Gujarat ||92

17) STUDY THE EFFECTS OF VARIOUS AUTONOMIC DRUGS ON FISH MELANOPHORES
Dr. Rekha Yadav, Gwalior (M.P.) ||97

18) महाराष्ट्र राज्याच्या विकासात स्त्रियांची भूमिका
प्रा.भांडवलकर बी.एन., ता.जि.बीड ||103

19) आदर्श अनुवादक गुणवैशिष्ट्ये
डॉ.सुरेश शिंदे, जि.लातूर ||105

20) महाराष्ट्र राज्याचा औद्योगिक विकास: एक विभागवार अभ्यास
बेलुरे विशाल चंद्रशेखर, जिल्हा नांदेड ||108

21) २१ वीं सदी की कहानी में वृध्द विमर्श अंतिम आस–जिंदगी उदास
डॉ. राजश्री भामरे, जि.लातूर (महाराष्ट्र) ||111

22) तुका झालासे कळस
प्रा.डॉ. राजाभाऊ भाऊसाहेब धायगुडे, जि.बीड ||114

23) परभणी आणि हिंगोली जिल्ह्यातील आश्रमशाळांमधील बंजारा समाजातील ...
डॉ.सुनिता आत्मारामजी टेंगशे & प्रा. विलास सोमा पवार, जि. हिंगोली ||118

24) गडचिरोली जिल्हयाच्या विकासातील आर्थिक समस्या व औद्योगिक स्थितीचे ...
डॉ. जी. जी. गोंडाने & संजय भास्कर मेश्राम, अकोला ||124

25) 'खाणकामव्यवसायामुळे निर्माण झालेली पुरस्थिती व पुरनियंत्रणाचा सविस्तर ...
महेश प्रभाकर रत्नपारखी, जिल्हा जालना ||129

26) श्री. कन्हैयालाल महाराज तीर्थक्षेत्र आमळी ता. साक्री, जि. धुळे
डॉ. शशीकांत गोकुळ साबळे, नाशिक ||134

27) २००० नंतरच्या भटक्या विमुक्त जमातींच्या आत्मकथनांचे बदलते स्वरूप
श्री. राजकुमार बबन शेलार, जि. पुणे ||137

28) नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक नुकसानीवर शासनाने राबविलेल्या ...
डॉ. अभिजीत वि. वेरुळकर, जि. वर्धा ||140



http://www.printingarea.blogspot.com

ISSN: 2394 5303 | Impact Factor 7.891(IIJIF) | Printing Area® Peer-Reviewed International Journal | April 2021 Issue-75, Vol-01 | 0137

कन्हैयालाल धबधबा, मत्स्या धबधबा आणि जांभाळी धबधबा व अनेक कमळांच्या तलावांमुळे पावसाळ्यात थक्क करणारे सौंदर्य अनुभवते.

**संदर्भ ग्रंथसूची :—**

1. Gazetter of Bombay presidency, khandesh District,vol. XII,1985

2. Gazetter of India, Maharashtra State Dhule District (Revised Edition),1974

३. श्री. आमळी तीर्थक्षेत्र महाराज कन्हैयालाल येथील मंदिरातील लिख्ति माहिती.

4. www.Dhule gov.in

5. www.loksatta,com 22.02.2017

6. www.lokmat.com 8.11.2019

**मुलाखत :—**

१. किरण नानाभाऊ दहिते, अध्यक्ष श्री. कन्हैयालाल महाराज तीर्थक्षेत्र आमळी, ता. साक्री, जि. धुळे, दि. ३०.११.२०२०

२. सैलू चौधरी, आमळी, ता. साक्री, जि. धुळे दि. ३०.११.२०२०

३. येदू देवराम गावित, आमळी ता. साक्री, जि. धुळे दि. ३०.११.२०२०

❑❑❑

**27**

# २००० नंतरच्या भटक्या विमुक्त जमातींच्या आत्मकथनांचे बदलते स्वरूप

श्री. राजकुमार बबन शेलार
ता. इंदापूर, जि. पुणे

**प्रस्तावना :**

भटक्या विमुक्त जमातींच्या आत्मकथनांनी मराठी साहित्य समद्ध केले आहे. या आत्मकथनांची किर्ती जागतिक पातळीपर्यंत गेली आहे. मराठी साहित्य विश्वाला अपूर्व असे योगदान या आत्मकथनांनी दिलेले आहे. कारण या आत्मकथनांतून अविष्कृत होणारे अनुभवकथन सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व धार्मिक जीवन विलक्षण अनुभव देणारे आहे. भटक्या विमुक्त जमातींच्या आत्मकथनांमध्ये ग्रामीण व शहरी भागातील जीवन व्यक्त झाले आहे. ग्रामीण भागातील येणाऱ्या भटक्या जातीजमातींचे ते जगत, भोगत असलेल्या जीवनांचे चित्रण आत्मकथनात आले आहे. या आत्मकथनांमध्ये पहिल्या पिढीतील जी निडरता नव्हती. ती निडरता २००० नंतरच्या भटक्या विमुक्त जमातींच्या आत्मकथनात प्रामुख्याने आढळून येते.

**२००० नंतर कालखंडातील भटक्या विमुक्त जमातींची आत्मकथने :**

भटक्या विमुक्त जमातींची आत्मकथने ही सामाजिक जाणीव आणि उपेक्षित समाजाचे वास्तव असलेला दस्तावेज आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारातून निर्माण झालेली ही आत्मकथने पहिल्या पिढीतील आत्मकथनांपेक्षा सर्वार्थाने वेगळी, भिन्न ठरली आहेत. कारण ही आत्मकथने केवळ अनुकरणातून आलेली असून सजग जाणिवेने लिहिली गेली आहेत. त्यामध्ये 'बिराड' हे अशोक पवार यांचे आत्मकथन (२००१) साली प्रकाशित झाले. विमल मोरे यांचे 'तीन दगडांची चूल' (२०००), रामचंद्र नलावडे यांचे 'दगडफोड्या' (२०००), संतोष पवार यांचे 'चोरटा' (२००१), रत्नेश पिंग्या काळे यांचे 'पारध्याचं जिणं' (२००७), ज्ञानेश्वर भोसले यांचे

'१४ महिने १३ दिवस आणि...' (२००९), शिवमूर्ती भांडेकर यांचे 'वळंबा' (२००७), बाबा वडार यांचे 'मी एक दगडफोड्या' (२००७), संगीता धायगुडे यांचे 'हुमान' (२०१०), प्रकाश चव्हाण यांचे 'उदई' (२००९), भीमराव जाधव यांचे 'कथा काटेरी कुंपणाची' (२०१३), रामचंद्र नलावडे यांचे 'रक्तचंदन' (२०१५), किसन चव्हाण यांचे 'आंदकोळ' (२०१५) इत्यादी आत्मकथने प्रगल्भ अशा जाणिवेतून निर्माण झालेली आहेत. भटक्या विमुक्त जमातींची इत्यादी आत्मकथने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेतून, सामाजिक जाणिवेतून, शिक्षणाच्या प्रसारातून आलेली आहेत.

२००० पूर्व भटक्या विमुक्त जमातींची आत्मकथने ही प्रतिकूल समाज व्यवस्थेत जीवन जगणाऱ्या आणि अपृश्यता व जातियतेचे भयंकर चटके सोसाव्या लागणाऱ्या पिढींची होती.

**२००० नंतरच्या कालखंडातील भटक्या विमुक्त जमातींच्या आत्मकथनांचे बदलते स्वरूप :**

२००० नंतरच्या आत्मकथनांचे स्वरूप वैविध्यपूर्ण आहेत. कारण २००० नंतर जागतिकीरण आले आणि जागतिकीरणामुळे इथले संपूर्ण समाज जीवन ढवळून निघाले. यातील समाज जीवन आधुनिकीकरणामुळे व बेरोजगारीमुळे भरडले गेलेले आहे. दारिद्र्य-गरिबीने पिचलेले आहे. बदलत्या व्यवस्थेमुळे त्यांच्याही वाट्याला उपेक्षाच आलेली आहे. त्यामुळे ही भटक्या विमुक्त जमातींची आत्मकथने केवळ दुःख, दारिद्र्य, गुन्हेगारी, भटकंती, वेदना, बेरोजगारी, व्यसन यांचेच दर्शन घडवत नाहीत, तर वर्तमानकालीन बदलत्या जीवनाचे विदारक वास्तव ही तितक्याच समर्थपणे त्यातून प्रगट झाले आहे. ही आत्मकथने भटक्या विमुक्त जमातीतील तरुणांची ३० ते ३५ वयोगटातील तरुणांनी लिहिलेली आहेत. हे प्रामुख्याने लक्षात घेतले पाहिजे. आत्मपरिक्षणासोबत समाजातील बदलत्या स्थितीगतीची भेदक चिकित्साही त्यांनी केली आहे. हे २००० नंतरच्या भटक्या विमुक्त जमातींच्या आत्मकथनातून दिसून येते.

२००० नंतरच्या भटक्या विमुक्त जमातींच्या आत्मकथनांमध्ये 'बिराड' हे अशोक पवार यांचे आत्मकथन आपले वेगळेपण सिद्ध करते. 'बिराड' या अशोक पवार यांच्या आत्मकथनात 'बेलदार' समाजाचा दांभिकपणा म्हणजे त्या समाजाचे जगणे, प्रथा, परंपरा, नातेसंबंध, अंधश्रद्धा, चालीरिती, विकार-वासना या सगळ्या जीवनजाणिवा प्रगट झाल्या आहेत. हे आत्मकथन बेलदार या समाजाचे असले तरी संपूर्ण भटक्या जमातींची व्यथा यात चित्रित झालेली आहे. पवार हे बेलदार समाजात जन्माला आलेले असल्यामुळे त्यांचे दुःख, वेदना त्यांनी निसंकोचपणे मांडली आहे. दारिद्र्य, भूक, बेरोजगारी, व्यसन, कर्जबाजारीपणा यामध्ये लेखक अडकलेला दिसून येतो. त्यातूनच गुन्हेगारीच्या शिक्यामुळे लेखकाला पशुतुल्य जीवन जगावे लागले आहे. स्वतंत्र्यानंतरच्या ६० वर्षानंतरही या समाजाचे जगणे बदललेले नाही. यातील अनुभव इतके विदारक आहेत की, आत्मकथन वाचताना वाचक मुळापासून हादरून जातो. लेखकाच्या दुःखाबरोबर समाजाचे दुःखही तेवढ्याच ताकतीने या आत्मकथनात प्रगट झालेले आहे.

'उदई' या प्रकाश चव्हाण यांच्या आत्मकथनात उपेक्षित पारधी समाजजीवनाचा जीवन आलेख प्रामुख्याने प्रगट झाला आहे. उदई म्हणजे अन्य धान्याला लागलेली कीड किंवा वाळवी. रूढी, परंपरा, प्रथा, अज्ञान, गुन्हेगारीचा शिक्का याची आपल्या जमातीला लागलेली वाळवी लेखकाने स्वतःच्या जीवन अनुभवातून प्रभावीपणे मांडली आहे. गुन्हेगारीच्या शिक्यामुळे पारधी समाजाचा विकास झाला नाही. पारधी जमातीत जन्मलेले लेखक प्रकाश चव्हाण विदर्भातील अविकसित ग्रामीण भागातील असल्यामुळे त्यांचे दुःख, वेदना, दारिद्र्य अधिक गडद चित्रीत झाले आहे. पशुतुल्य जीवन जगणाऱ्या पारधी समाजाच्या प्रगतीसाठी शासनाने दर्जेदार शिक्षणासह, पुनर्वसनाची युद्ध पातळीवर व्यवस्था करून त्यांना मुख्य प्रवाहात आणण्याची प्रकर्षाने गरज आहे. ही बाब प्रकाश चव्हाण यांचे 'उदई' हे आत्मकथन आधोरेखित करते. आणि हेच या आत्मकथनाचे वेगळेपण आहे. आजच्या आधुनिक युगामध्ये चव्हाण त्यांच्या समाजामध्ये कोणताही बदल झालेला नाही.

'आंदकोळ' हे किसन चव्हाण यांचे आत्मकथन समाजव्यवस्थेशी चिरफाड करणारे आत्मकथन आहे. प्रतिकूल व्यवस्थेत जन्मजात गुन्हेगारीचा शिक्का बसलेल्या पारधी जातीत लेखकाचा जन्म झाला आहे. किसन चव्हाण हे भटक्या-विमुक्त चळवळीत काम करणारे कार्यकर्ते आहेत. आंदकोळ म्हणजे न थांबणारे वादळ होय. किसन चव्हाण यांचे आयुष्य इथल्या व्यवस्थेशी झगडत सतत संघर्ष करत, लढा देत उभे आहे. म्हणजेच हे जीवन वादळी जीवन आहे. म्हणून त्यांनी आपल्या आत्मकथनाला 'आंदकोळ' हे नाव

दिले आहे. हे आत्मकथन फक्त दुःख, वेदना, दारिद्र्य सांगून थांबत नाही तर हक्क, अधिकार व सामाजिक न्यायासाठी लढायला शिकवते म्हणूनच हे आत्मकथन रडगाणं ठरत नसून व्यवस्थेने वर्षानुवर्ष दाबलेल्या व नाकारलेल्या बहुसंख्य शोषितांचे व भटक्यांचे जीवनगाणे ठरते. हे एक विशेष आहे. 'वळंबा'मध्ये शिवमूर्ती भांडेकरांनी त्यांच्या जीवन संघर्षाचे चित्रण करतानाच वडार जातीचा सामाजिक व धार्मिक इतिहास मांडला आहे. आपले संघर्षमय जीवन जगत असताना भांडेकरांनी मुलांच्या शिक्षणासाठी अविरत प्रयत्न करणारा अशिक्षित पण हुशार तम्मा रेखाटला आहे. या समाजचित्रणामध्ये त्यांची सामाजिक जाणिव दिसून येते.

'मी एक दगडफोड्या' या बाबा वडार यांच्या आत्मकथनात प्रबळ अशा सामाजिक जाणिवा आढळतात. समाजदर्शन हे या आत्मकथनाचे महत्त्वाचे वैशिष्ट्ये आहे. भटकंती करणाऱ्या वडार जातीचे जीवन एका गावातून दुसऱ्या गावात कामानिमित्त भटकण्यात जाते. या वडार जातीत अंधश्रद्धा आहे. व्यसनाधिनता आहे. अज्ञानामुळे या जातीत दारूला विशेष महत्त्व आहे. जातपंचायतीला विशेष महत्त्व या आत्मकथनातून दिसून येते. स्त्रीयाचे शोषण या जातपंचायतीतून होते. वडार स्त्री-पुरूष रूढी परंपरा, अज्ञान, अंधश्रद्धा यांच्यात अडकलेला दिसून येतात. वडार समाजातील अनेक चित्रणे या आत्मकथनात आली आहेत.

थोडक्यात मराठी साहित्याला समृद्ध करणारी ही आत्मकथने बदलत्या युगाचा चेहरा अधिक स्पष्ट करणारी ठरली आहेत. या भटक्या विमुक्त जमातींच्या आत्मकथनांची आणखी एक जाणीव आहे. ती म्हणजे शिक्षणाची. या जाती जमातींच्या आत्मकथनकारांना शिक्षणाचे मोल समजले आहे. यामुळे ही पिढी स्वत: शिक्षण घेऊन आपल्या जाती जमातीला शिक्षण घेण्यास प्रेरित करते. जगण्यासाठी सतत भटकंती करणाऱ्या या जाती जमातींमध्ये आजही अंधश्रद्धा दिसून येते. २००० नंतरच्या भटक्या विमुक्त जमातींच्या आत्मकथनात या जाती जमाती समाजाच्या मुख्य प्रवाहापासून आजही कोसो मैल दूर आहेत. भटकंतीची समस्या काही प्रमाणात कमी झाली आहे. परंतु उदरनिर्वाहासाठी आजही कोणतेही साधन या जाती जमातींकडे नाहीत. त्यामुळे प्रचंड बेरोजगारी या जाती जमातीत दिसून येते. परंतु काही प्रमाणात भटक्या विमुक्त जमातींमध्ये शिक्षणाची झालेली जागृती, त्यांचे पटलेले महत्त्व आणि प्रत्यक्ष शिक्षित झालेली एक पिढी दिसून येते.

**निष्कर्ष :**

१. २००० नंतरच्या भटक्या विमुक्त जमातींच्या आत्मकथनातून बदलत्या व्यवस्थेचे स्वरूप नव्या सामाजिक जाणिवांसह प्रगट झाले आहे.

२. २००० नंतरच्या कालखंडातील भटक्या विमुक्त जमातींची आत्मकथने समाजातील भीषण सामाजिक, सांस्कृतिक वास्तवाची चित्रण करून समाजाला क्रांती करण्यास प्रेरीत करतात.

३. ही आत्मकथने फक्त दुःख, वेदना, शोषण व यातना सांगून थांबत नाहीत. तर हक्क अधिकारांची जाणीव निर्माण करतात आणि सामाजिक समतेसाठी संघर्ष करताना दिसतात.

४. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्रेरणा आणि शिक्षणाच्या प्रसारामुळे भटक्या विमुक्त जमातींची आत्मकथने आपली स्त्री विषयक जाणीव मुक्तपणे प्रगट करताना दिसतात. तसेच कुठलेही दडपण न घेता स्त्रियांदेखील आपले जीवनानुभव निर्भयपणे प्रगट करतात.

५. २००० नंतरच्या कालखंडातील भटक्या विमुक्त जमातींची आत्मकथने लढत संघर्ष करीत जीवन जगण्याचे तत्त्वज्ञान देणारी पुरोगामी व परिवर्तनवादी विचाराला प्रेरक ठरणारी आहेत.

६. २००० नंतरच्या कालखंडातील भटक्या विमुक्त समाजातील तरूण आत्मकथनात मोलाची भर घालून समतेसाठी लढा उभारताना दिसतात.

**संदर्भ ग्रंथ :**


१. डॉ. रविंद्र केदार, डॉ. गोपाळ ढोले, 'दलित आत्मकथने : चिंतन आणि चर्चा', अर्थव पब्लिकेशन्स, धुळे, प्रथमावृत्ती २०१३, पृ. ५९

२. पवार अशोक, 'बिराड', मनोविकास प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती २००१, पृ. २

३. चव्हाण प्रकाश, 'उदई' ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, प्रथमावत्ती २०१०, पृ. ५

४. चव्हाण किसन, 'आंदकोळ' ग्रंथाली प्रकाशन, मुंबई प्रथमावृत्ती २०१५, पृ. ८

५. प्रा. गोरे सरला, 'भटक्या विमुक्तांचे साहित्य आणि इतर लेख', गोदा प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती २०१६, पृ. ४०, ४१